नवनिर्मित पालघर जिल्हयासाठी जिल्हा परिषदेकरिता कृषि विभाग संबंधित गट-क व गट-ड संवर्गातील पदे निर्माण करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण- ५०१६/प्र.क्र -४४/आस्था-८,

२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मंबई-४०० ००१,
दिनांक : १२ फेब्रुवारी , २०१६.

वाचा -

१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक-एपिटी-१००१ /प्र.क्र.९६०/ आस्था-८, दिनांक २७.०६.२००३.

२) शासन अधिसूचना, महसुल व वन विभाग , क्रमांक -प्राफेब-११०८/ प्र.क्र.१६७ /ठाणे /म-१०, दिनांक ३१ जुलै,२०१४

प्रस्तावना:-

संदर्भाधिन क्रमांक (२) येथील महसुल व वन विभाग क्र.प्राफेब-११०८ / प्र.क्र.१६७ / ठाणे / म-१०, दिनांक ३१ जुलै,२०१४ च्या अधिसूचने अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासुन पालघर,वसई,डहाणू, तलासरी,जव्हार,वाडा,मोखाडा आणि विक्रमगड या आठ तालुक्यांचा समावेश असलेला नवनिर्मित पालघर जिल्हा निर्माण करण्यात आला असुन त्यांचे मुख्यालय पालघर येथे ठेवण्यात आलेले आहे.

या विभागाने जिल्हा परिषदेमधील विविध विभागांतर्गत गट-क व गट-ड संवर्गाचा आकृतीबंध शासन निर्णय क्रमांक-एपिटी-१००१/प्र.क्र.९६०/आस्था-८, दिनांक २७ जुन, २००३ च्या शासन निर्णयानुसार निश्चित केलेला आहे. कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांनुसार कामांची व्याप्ती व अधिकारी /कर्मचा-यांच्या कर्तव्य व जबाबदा-या विचारात घेवुन जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाच्या कार्यालयासाठी १५ पदे निश्चित करण्यात आलेली आहेत.

दिनांक ७ ऑगस्ट, २०१४ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवुन नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेच्या कृषि विभागासाठी १५ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे.

**शासन निर्णय** :-

या विभागाच्या दिनांक २७.०६.२००३ व कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक-आकृवि-१२०८/प्र.क्र.८७/१५-अे, दिनांक ०९.०८.२०११ अन्वये जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर या कार्यालयासाठी १५ पदे निर्माण करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

i) चतुर्थश्रेणी कर्मचारी जसे परिचर,शिपाई,पहारेकरी,नाईक, सफाईगार इत्यादी असा वेगवेगळा संवर्ग न ठेवता एकच संवर्ग चतुर्थश्रेणी कर्मचारी असे पद कार्यरत राहील. त्यांच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या

ह्या Multitasking स्वरुपाच्या असतील . सदर पदांची कामे बाहय यंत्रणेकडून करुन घेतांना जॉबचार्ट निश्चित करुन, निकष ठरवून कामे देण्यात यावीत. बाहयस्त्रोताद्वारे (Outsourcing) काम करुन घेतांना Multitasking करण्याची क्षमता असणारा मनुष्यबळ मिळविण्याचा प्रयत्न करण्यात यावा जेणेकरुन कमी मनुष्यबळाकडून जास्त कामे करुन घेणे शक्य होईल.

ii) लिपीक टंकलेखक/लघुलेखक या पदांना मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील टंकलेखन/श्रुतलेखनाचे व संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक राहील. या पदांची कामे प्रचलित नियमानुसार बाहययंत्रणेकडून करुन घेण्यात यावीत.

पालघर जिल्हा परिषदेच्या कृषि विभागासाठी गट-क व गट-ड ची मंजूर पदे.

| अ. क्र. | पदनाम | लेखा व संवर्ग | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लिपीक वर्गीय) श्रेणी-एक | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | १ |
| २ | कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लिपीक वर्गीय) श्रेणी-दोन | ९३००-३४८०० ग्रेड पे-४२०० | १ |
| ३ | सहाय्यक लेखाधिकारी | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लेखा) श्रेणी-एक | ९३००-३४८०० ग्रेड पे-४३०० | १ |
| ४ | वरिष्ठ सहाय्यक (आस्था) | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लिपीक वर्गीय) श्रेणी-तीन | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | २ |
| ५ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लेखा) श्रेणी-तीन | ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | १ |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (लेखा) श्रेणी-तीन | ५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | १ |
| ७ | कनिष्ठ सहाय्यक | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुय्यमलिपीक वर्गीय) श्रेणी-एक | ५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | ४ |
| ८ | वाहनचालक | जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुय्यम अभियांत्रिकी) श्रेणी-एक | ५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | १ |
| ९ | चतुर्थश्रेणी कर्मचारी | जिल्हा सेवा (वर्ग-चार) | ४४००-७४४० ग्रेड पे-१३०० | ३ |
| | | एकूण : | | १५ |

उपरोक्त नमूद पदांचे वेतन व भत्ते याबाबतचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष : मागणी क्रमांक -डी-३

२४०१, पीकसंवर्धन,

(००) (०७) जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान

(२४०१०९६३)

सदर आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-असंक-१००१/प्र.क्र.२९/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.०९.२००१ अन्वये नवीन पदनिर्मीती, व्यपगत पदांचे पुर्नजीवन, पदांचा आढावा इत्यादी प्रस्तावांची तपासणी करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या दिनांक ०७.०८.२०१४ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीत प्रस्तुत पदे निर्माण करण्यास देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१३०४४४९३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sharad Shantaram Yadav

Digitally signed by Sharad Shantaram Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sharad Shantaram Yadav
Date: 2016.02.12 16:59:53 +05'30'

( शरद यादव )

कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

प्रति,

Finjam
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री,कृषि/ग्राम विकास/जलसंधारण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, कृषि/ग्रामविकास/जलसंधारण यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
मुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे / पालघर
मुख्य लेखा अधिकारी जिल्हा परिषद ठाणे / पालघर
जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे / पालघर
महालेखापाल १ /२ (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता ) मुंबई/ नागपूर
संचालक,लेखा व कोषागारे,मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
वित्त विभाग (अर्थसंकल्प-३/व्यय-१५,वित्तीय सुधारणा -१ ) मंत्रालय मुंबई
कृषि विभाग (कार्यासन-१५ - अे ) मंत्रालय मुंबई
क.अ (वित्त-१ कार्यासन) ग्राम विकास व जलसंधारण विभाग
सर्व सह/ उप सचिव ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग
निवड नस्ती , (आस्था-८)